दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## आजचे पंचांग

बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, त्रयोदशी रात्री १०-३२ पर्यंत,
दिवस नक्षत्र - पूर्वाभाद्रपदा दुपारी ३-२३ पर्यंत, चंद्र रास - कुंभ सकाळी ९-३८ पर्यंत नंतर मीन, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

## बेबी कॉर्न निर्यात घटली

**पुणे:** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतातून होणाऱ्या बेबी कॉर्न निर्यातीवर निर्बंध आले असून, त्याचा फटका शेतकऱ्यांना बसू लागला आहे. परदेशी खरेदीदारांकडून मागणी कमी झाल्याने उत्पादित माल पाठविण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे अर्थकारण संकटात सापडले आहे. बेबी कॉर्न म्हणजे कोवळ्या अवस्थेत काढलेले मक्याचे लहान कणीस असून भाजी, सूप आणि सॅलडमध्ये त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. १५ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २०० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### सायबर फसवणुकी प्रकरणी तिघांना अटक

**नवी दिल्ली :** अनेक स्तरांवरील व्यवहारांद्वारे १.५ कोटी रुपयांहून अधिक सायबर फसवणुकीची रक्कम वळवणाऱ्या 'म्युल अकाउंट सिंडिकेट'चे संचालन केल्याच्या आरोपाखाली तीन जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. वेगवेगळ्या राज्यांमध्ये नोंदवलेल्या सायबर फसवणुकीच्या तक्रारींशी संबंध असल्यामुळे संशयास्पद बँक खाते निदर्शनास आल्यानंतर या रॅकेटचा पर्दाफाश झाला.

### मतदारसंघ पुनर्रचनेत दक्षिणेवर अन्याय

**हैदराबाद :** तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी मंगळवारी मतदारसंघ पुनर्रचनेवरून केंद्र सरकारवर टीका केली. जागांच्या संख्येत पुरेशी वाढ न झाल्यास दक्षिणेकडील राज्यांमधील महिला, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींवर अन्याय होईल, असा आरोप त्यांनी केला. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला आदरांजली वाहिल्यानंतर एका सभेला संबोधित करताना ते बोलत होते. पंतप्रधान मोदी दक्षिणेकडील राज्यांना डावलून उत्तरेतील जागा वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याच्या आरोप त्यांनी केला.

### अमेरिका-इराण पुढील आठवड्यात चर्चा?

**इस्लामाबाद:** इराण आणि अमेरिकेला पुन्हा वाटाघाटीच्या टेबलावर आणण्यासाठी पाकिस्तान उच्चस्तरीय संपर्क साधत असून, पुढील आठवड्यापर्यंत इस्लामाबादमध्ये चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी दोन्ही पक्ष पुन्हा भेटू शकतात, असे मंगळवारी एका वृत्तात म्हटले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाटाघाटी २१ एप्रिल रोजी शस्त्रसंधी संपण्यापूर्वी पुन्हा चर्चा होऊ शकते, असे वृत्त आहे.

### ८५० जागांसह महिला आरक्षणाचा मार्ग मोकळा

# लोकसभा विस्ताराचा प्रस्ताव येणार ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने लोकसभेतील सदस्यसंख्या विद्यमान ५४३ वरून तब्बल ८५० पर्यंत वाढवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पुढे आणला असून, त्यामागे संसद आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी आणि मतदारसंघ पुनर्रचना (परिसीमन) सुलभ करण्याचा स्पष्ट उद्देश असल्याचे समोर येत आहे.

या संदर्भातील घटनादुरुस्ती विधेयकाचा मसुदा खासदारांना पाठवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनात या व्यापक बदलांना मंजुरी मिळवण्याचा सरकारचा मानस असून, त्यामुळे देशाच्या संसदीय रचनेत दीर्घकालीन आणि मूलभूत बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रस्तावित आराखड्यानुसार, लोकसभेतील एकूण ८५० जागांपैकी ८१५ जागा राज्यांसाठी तर ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव असतील. या विस्तारामुळे लोकसंख्येचा प्रमाणात प्रतिनिधित्व अधिक संतुलित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्या वाढ आणि प्रादेशिक असमतोल लक्षात घेता, विद्यमान जागा अपुऱ्या पडत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. त्यामुळे नव्या मतदारसंघांची निर्मिती आणि जुन्या सीमांचे पुनर्रेखन अपरिहार्य ठरत आहे.

२०२३ मध्ये मंजूर झालेल्या नारी शक्ती वंदन अधिनियम अंतर्गत लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या कायद्याची अंमलबजावणी जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेवर अवलंबून ठेवण्यात आली होती. नवीन प्रस्तावामुळे ही अट शिथिल करून, २०११ च्या जनगणनेच्या आधारेच आरक्षण लागू करण्याचा पर्याय विचाराधीन आहे. यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपासून महिला आरक्षण प्रत्यक्षात लागू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मतदारसंघ पुनर्रचना ही प्रक्रिया सहसा दीर्घकाळ चालणारी आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानली जाते. २०२७ नंतर होणाऱ्या पुढील जनगणनेनंतरच परिसीमन पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, सरकारला २०२९ पूर्वीच ही प्रक्रिया पूर्ण करून आरक्षण लागू करायचे असल्याने सदस्यसंख्या वाढ हा पर्यायी मार्ग निवडण्यात आल्याचे दिसते. या प्रक्रियेत आरक्षित जागांचे फेरबदल करण्याची तरतूदही कायम राहणार आहे, ज्यामुळे विविध भागांमध्ये महिलांना प्रतिनिधित्वाची संधी मिळेल. लोकसभा विस्ताराचा हा प्रस्ताव केवळ तांत्रिक बदल नसून त्याचे व्यापक राजकीय परिणाम होऊ शकतात. विशेषतः, लोकसंख्या वाढीचा वेग वेगवेगळ्या राज्यांमध्ये भिन्न असल्याने, उत्तर आणि दक्षिण राज्यांमधील प्रतिनिधित्वाचा समतोल बदलण्याची शक्यता आहे. यामुळे काही राज्यांकडून विरोध होण्याची शक्यता आधीच व्यक्त होत असून, संघराज्यीय रचनेवर त्याचा परिणाम होईल का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.

## १ मे पासून रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी बंधनकारक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** येत्या १ मेपासून, म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून राज्यातील सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे बंधनकारक करण्यात आले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, मराठी लिहिता किंवा वाचता न येणाऱ्या चालकांचे परवाने थेट रद्द करण्यात येतील.

परिवहन विभागाने विद्यमान नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असून, यापुढे कोणतीही शिथिलता ठेवली जाणार नाही. केवळ चालकांवरच नव्हे, तर नियम डावलून परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाईल, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. गेल्या काही महिन्यांत मराठी भाषेच्या मुद्द्यावर वादंग निर्माण झाला होता. काही रिक्षा चालकांनी मराठी शिकण्यास नकार दिल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. तसेच प्रवाशांकडून मराठीत संवाद साधण्यास चालक टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर सरकारने हा निर्णय घेतला आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी १ मेपासून राज्यातील ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेदरम्यान चालकांची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यांना मराठी वाचता व लिहिता येते का, याची चाचणी घेतली जाणार आहे. "ज्या राज्यात आपण व्यवसाय करतो, त्या राज्याच्या भाषेचा आदर करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे," असे सांगत परिवहन मंत्र्यांनी नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

## मुंबईत ३० कोटींच्या ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबईतील अंधेरी परिसरात ड्रग्ज तस्करीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, सहार रोडवरील एका साध्या चाळीत अवघ्या १३ हजार रुपये भाड्याच्या खोलीत तब्बल ३० कोटी रुपयांच्या 'एमडी' (मेफेड्रोन) या सिंथेटिक अमली पदार्थाची निर्मिती सुरू असल्याचे पोलिसांच्या कारवाईत समोर आले आहे. या प्रकरणी मोहम्मद आरिफ मोहम्मद इलियास शेख (४४) या मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे.

भास्कर चाळीतील एका साध्यासुध्या खोलीतून कोट्यवधींचा हा बेकायदेशीर धंदा चालत असल्याने स्थानिकांसह पोलिसही काही काळ अंधारात होते. आरोपीने अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने मर्यादित जागेतच ड्रग्ज निर्मितीची यंत्रणा उभी केली होती. प्राथमिक तपासात दरमहा २५ ते ३० कोटी रुपयांच्या 'एमडी'ची निर्मिती येथे होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेला आरिफ शेख हा यापूर्वी गुजरात पोलिसांच्या ताब्यातून फरार झाला होता. त्यानंतर तो मुंबईत नाव बदलून लपून राहत होता आणि याच काळात त्याने ड्रग्ज निर्मिती व पुरवठ्याचे जाळे उभे केले. या कारवाईमुळे मुंबईतील ड्रग्ज तस्करीचे जाळे किती खोलवर आणि संघटित स्वरूपात कार्यरत आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. तपास यंत्रणांसमोर आव्हान अधिकच वाढले आहे.

### बिहारमध्ये नितीश कुमारांचा राजीनामा

# सम्राट चौधरी भाजपचे पहिले मुख्यमंत्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा :** देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असताना बिहारमध्ये मोठी घडामोड घडली आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून, भाजपचे सम्राट चौधरी यांच्या नावाची मुख्यमंत्रीपदासाठी घोषणा केली आहे.

मंगळवारी सकाळी ११ वाजता झालेली मंत्रिमंडळ बैठक ही नितीश कुमार यांच्या कार्यकाळातील शेवटची बैठक ठरली. त्यानंतर त्यांनी लोकभवन येथे जाऊन राज्यपालांकडे आपला राजीनामा सादर केला. यामुळे



बिहारच्या सत्तांतराची प्रक्रिया औपचारिकरीत्या सुरू झाली आहे.

नितीश कुमार यांनी दीर्घकाळ बिहारचे नेतृत्व केले आहे. मात्र, अलीकडेच त्यांनी राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होण्याचा निर्णय घेतला. १० एप्रिल २०२६ रोजी त्यांनी नवी दिल्लीत राज्यसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. उपराष्ट्रपती तथा राज्यसभा सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली.

नितीश कुमार यांच्या या निर्णयामुळे बिहारमध्ये भाजपला प्रथमच मुख्यमंत्रीपद मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यातील सत्ताधारी जदयू आणि भाजप यांच्यातील समन्वयानंतर नव्या सरकारच्या स्थापनेसाठी हालचालींना वेग आला. भाजप आमदारांची बैठक तसेच एनडीएच्या आमदारांची संयुक्त बैठक विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये पार पडली. या बैठकीत सम्राट चौधरी यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली. त्यामुळे ते बिहारचे पुढील मुख्यमंत्री होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या घडामोडींमुळे बिहारच्या राजकारणात नव्या समीकरणांची सुरुवात झाली असून, आगामी काळात त्याचे राष्ट्रीय राजकारणावरही परिणाम दिसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बुधवारी लोकभवन येथे सकाळी ११ वाजता त्यांचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. या बैठकीसाठी केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान निरीक्षक म्हणून उपस्थित होते. तसेच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन, बी. एल. संतोष आणि विनोद तावडे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

सम्राट चौधरी हे सध्या बिहारचे उपमुख्यमंत्री असून गृह खात्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. ते बिहार विधान परिषदेत विरोधी पक्षनेतेही राहिले असून भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्यांचा राजकीय प्रवास राष्ट्रीय जनता दल पासून सुरू झाला. ते मुंगेर जिल्ह्यातील असून त्यांचे वडील शकुनी चौधरी हे समता पक्षाचे संस्थापक सदस्य होते. ते एकेकाळी लालू प्रसाद यादव यांचे निकटवर्तीय मानले जात होते.

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

# परस्पर संमतीच्या घटनेत माघार शक्य नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** परस्पर संमतीने घटस्फोटाच्या प्रकरणात एकदा सर्व वादांवर 'पूर्ण आणि अंतिम तडजोड' झाल्यानंतर पती किंवा पत्नीला संमती मागे घेता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालय यांनी दिला आहे. न्यायालयाने या प्रकरणात तडजोडीनंतर अटींचे उल्लंघन करणाऱ्या पत्नीवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले.

सदर प्रकरणात संबंधित दाम्पत्याचा विवाह २००० साली झाला होता. २०२३ मध्ये पतीने घटस्फोटासाठी अर्ज केला.



कौटुंबिक न्यायालयाने प्रकरण मध्यस्थी केंद्राकडे पाठवले, जिथे दोन्ही पक्षांमध्ये लेखी तडजोड झाली. या करारानुसार पतीने पत्नीला १.५ कोटी रुपये, कारसाठी १४ लाख रुपये आणि दागिने देण्याचे मान्य केले, तर पत्नीने संयुक्त व्यवसायातील २.५ कोटी रुपये पतीच्या नावे करण्यास सहमती दर्शवली. दोन्ही बाजूंनी व्यवहार पूर्ण केल्यानंतर, घटस्फोटाच्या अंतिम टप्प्यात पत्नीने अचानक संमती मागे घेतली आणि पती व सासूविरुद्ध कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली. यावर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

न्यायमूर्ती राजेश बिंदल आणि विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, "सामान्यतः अंतिम आदेशापूर्वी संमती मागे घेण्याचा अधिकार असतो. मात्र, सर्व अटींवर तडजोड होऊन व्यवहार पूर्ण झाल्यानंतर तो अधिकार राहत नाही. न्यायालयीन तडजोड ही मूळ वादाची जागा घेते. त्यातून माघार घेणे म्हणजे न्यायव्यवस्थेचा गैरवापर आहे."

पत्नीने अतिरिक्त १७० कोटी रुपयांच्या सोन्याचा तोंडी करार असल्याचा दावा केल्यावर न्यायालयाने तीव्र शब्दांत टीका करत, हा दावा "कायदेशीर व्यवस्थेची थट्टा" असल्याचे म्हटले. तसेच, २३ वर्षांच्या वैवाहिक आयुष्यानंतर दाखल केलेली कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार ही केवळ पतीला त्रास देण्यासाठी केलेली 'पळवाट' असल्याचे निरीक्षण नोंदवले. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय यांनी भारतीय राज्यघटनेतील कलम १४२ अंतर्गत विशेष अधिकार वापरून विवाह संपुष्टात आणला. तसेच पत्नीने दाखल केलेली तक्रार रद्द करून पतीला उर्वरित रक्कम देण्याचे निर्देश दिले.

## रशियन तेल आयात तिप्पटीने वाढली

**नवी दिल्ली :** खरेदीचे प्रमाण दुप्पट झाल्याने आणि तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे आयातीचा खर्च वाढल्याने, भारताने रशियाकडून केलेली कच्च्या तेलाची खरेदी मार्च महिन्यात तिप्पटीहून अधिक वाढून ५.३ अब्ज युरो झाली. युरोपियन थिंक टँक 'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर'ने एका अहवालात म्हटले आहे की, फेब्रुवारीमध्ये खरेदीत घट झाल्यानंतर, भारतात मार्चमध्ये खरेदीचा जोर वाढला आहे. मार्च मध्ये भारत रशियाकडून जीवाश्म इंधन खरेदी करणारा दुसरा सर्वात मोठा देश होता, ज्याने एकूण ५.८ अब्ज युरो किमतीचे रशियन हायड्रोकार्बन्स आयात केले.

## महामानवाला अभिवादन;चैत्यभूमीवर लोटला भीमसागर

### मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वंदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला आपण जेवढे अभिवादन करू तेवढे कमी आहे. महामानवाने संविधान लिहिले आणि देश बदलवला, सर्व भेद संपवले. तसेच सर्व भेद संपवण्याचे काम संविधानाने केले आहे. भारत प्रगती करत आहे कारण भारताला सर्वाधिक चांगले संविधान दिले आहे. जगात सर्वात मोठ्या प्रमाणात जयंती कोणाची होत असेल तर ती बाबासाहेब आंबेडकर यांची होते. भगवान बुद्ध यांनी 'अत् दीप भव:' हा संदेश दिला. भारतात एक सेंट्रल बँक असली पाहिजे, असे बाबासाहेब यांनी सांगितले होते. म्हणून रिझर्व्ह बँक स्थापन झाली. याची मूळ कल्पना ही बाबासाहेब यांची होती. असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती महोत्सव दिनानिमित्त दादरच्या चैत्यभूमी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे निर्माते होते, तसेच ते माणसकीचेही निर्माते होते. चवदार तळ्याच्या एका चळवळीने देशात सामाजिक क्रांती केली, जगात अनेक ज्ञानी, विचारवंत झाले. मात्र बाबासाहेबांनी त्यांचे ज्ञान स्वतःसाठी न वापरता शोषित, वंचित, दीन-दलितांच्या उद्धारासाठी वापरले आहे. संविधान हा आपल्या देशाचा पाया आहे. आज एक सर्वसामान्य व्यक्ति देशाच्या उच्च स्थानी विराजमान होतो. आमच्या सुनेत्राताई उपमुख्यमंत्री होतात.. ही संविधानाची देण आहे. आमच्या सरकारच्या डीएनए हा बाबासाहेब असल्याचे म्हटले तर वावगे ठरणार नाही, अशी प्रतिक्रियाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना दिली.

### पुणे विमानतळाला मोठा दिलासा

# १५ नव्या स्लॉट्समुळे कनेक्टिव्हिटीला मोठा वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील वाढत्या हवाई वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे विमानतळाला मोठा दिलासा मिळाला आहे. भारतीय हवाई दल यांनी १५ अतिरिक्त उड्डाण स्लॉट्सना मंजुरी दिल्याने विमानतळावरील एकूण स्लॉट्सची संख्या २२० वरून २३५ वर पोहोचली आहे. या निर्णयामुळे मे महिन्यापासून पुण्याहून देशातील विविध महत्त्वाच्या शहरांसाठी थेट विमानसेवा सुरू होणार असून, प्रवाशांना अधिक पर्याय उपलब्ध होणार आहेत.

या निर्णयामागे केंद्रीय नागरी विमानचालन राज्यमंत्री मुरलीधर



मोहोळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. हवाई दलाने दिवसाच्या वेळेत हे अतिरिक्त स्लॉट्स उपलब्ध करून दिल्यामुळे उड्डाणांची वेळ अधिक सोयीची ठरणार आहे. विमानतळ संचालक संतोष ढोके यांनी सांगितले की, "नवीन उड्डाणांमुळे पर्यटन, व्यापार आणि प्रादेशिक संपर्काला चालना मिळेल."

नव्या स्लॉट्समुळे अनेक महत्त्वाच्या मार्गांवर उड्डाणे सुरू होत आहेत. स्टार एअर १ मेपासून तिरुपती-सोलापूर-पुणे अशी सेवा सुरू करणार आहे. या मार्गावर विमान दुपारी ३.२० वाजता पुण्यात येईल आणि ४ वाजता पुढे सोलापूरकडे रवाना होईल. एअर इंडिया बागडोगरा मार्गावर दररोज उड्डाण सुरू करत असून, दुपारी १२.३५ वाजता आगमन आणि १.१५ वाजता प्रस्थान असे वेळापत्रक असेल. ईशान्य भारतासाठी हा मार्ग महत्त्वाचा मानला जातो.

मंगळुरूसाठी फ्लाय ९१ कंपनी दररोज सेवा देणार असून, सायंकाळी ६.४० वाजता विमान पुण्यात येईल आणि ७.०५ वाजता पुन्हा मंगळुरूकडे जाईल. इंडिगो २ मेपासून पाटणा-पुणे या मार्गावर आठवड्यातून तीन दिवस (मंगळवार, गुरुवार, शनिवार) उड्डाणे चालवणार आहे. तसेच आकासा एअर वाराणसी मार्गावर आणि एअर इंडिया एक्सप्रेस बंगळूरू मार्गावर नवीन सेवा सुरू करत आहेत. याशिवाय स्पाईसजेट गोवा-पुणे-चेन्नई, आकासा एअर वाराणसी-पुणे आणि एअर इंडिया एक्सप्रेस बंगळूरू-पुणे या मार्गावरही १ मेपासून सेवा सुरू होणार आहे.

या सर्व नव्या उड्डाणांमुळे पुण्याचा देशातील प्रमुख शहरांशी संपर्क अधिक सुलभ होणार आहे. पुणे विमानतळावर सध्या संरक्षण दलाच्या नियंत्रणामुळे उड्डाण स्लॉट्स मर्यादित आहेत. त्यामुळे अतिरिक्त स्लॉट्सची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. प्रवाशांनाच नव्हे तर उद्योग, पर्यटन आणि व्यापार क्षेत्रालाही याचा फायदा होणार आहे. पुणे विमानतळाची क्षमता वाढून शहराच्या हवाई संपर्कात सुधारणा होणार आहे. आणखी उड्डाणांसाठी मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.

## अप्पर जिल्हाधिकाऱ्यावर खंडणीचा आरोप; गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अकोला :** खाण व स्टोन क्रशर व्यवसायाशी संबंधित उद्योजकांकडून बेकायदेशीर रक्कम मागितल्याचा आरोप अप्पर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर करण्यात आला आहे. अकोला जिल्हा खाण आणि क्रशर उद्योजक संघाचे कार्यकारी अध्यक्ष विवेक बिजवे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, संघटनेतील प्रत्येक सदस्याकडून १५ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. काही सदस्यांनी भीतीपोटी ही रक्कम दिल्याचाही दावा करण्यात आला आहे, ज्यामुळे प्रकरणाची गंभीरता वाढली आहे. मार्च महिन्यात वारंवार फोन करून तसेच प्रत्यक्ष भेट घेऊन पैशांची मागणी करण्यात आली. पैसे न दिल्यास कारवाई करण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही सदस्यांकडून रक्कम स्वीकारल्यानंतर उर्वरित सदस्यांवरही दबाव टाकण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या सर्व प्रकरणाचे कॉल रेकॉर्डिंग पुरावा म्हणून सादर करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून या प्रकरणाचा पुढील चौकशीत नेमकी सत्यस्थिती समोर येणार आहे.

## संपादकीय

# प्रतीकांचा उत्सव आणि वास्तवाचा वनवास



**राजकीय 'ब्रँडिंग' आणि सत्तेचे वास्तव यात जेव्हा अंतर पडते, तेव्हा 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'सारखी प्रतीकात्मक मृगजळे निर्माण होतात. टाळ्यांच्या गजरात मंजूर झालेल्या या कायद्याची अंमलबजावणी मात्र भविष्यातील अनिश्चिततेवर टांगलेली आहे. हा सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रामाणिक प्रयत्न आहे की केवळ निवडणूकपूर्व मांडलेला प्रतीकवादाचा खेळ, हा प्रश्न उरतोच.**

भारतीय राजकारणात 'काळाची गरज' आणि 'निवडणुकीची गणिते' यांचा संगम झाला की, ऐतिहासिक निर्णयांचा घाट घातला जातो. 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'च्या निमित्ताने संसदेत जे काही घडले, तो याच मांडणीचा एक भाग. लोकशाहीच्या मंदिरात टाळ्यांच्या कडकडाटात एका विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले आणि 'स्त्री-शक्ती'चा जयघोष झाला. प्रतीकात्मकतेच्या या दाट धुक्यात वास्तवाचा सूर्य नेमका कुठे आहे, याचा शोध घेणे आता अनिवार्य झाले आहे. कुठल्याही कायद्याचे मोठेपण हे त्याच्या उदात्त हेतूत नसते, तर त्याच्या अंमलबजावणीच्या प्रामाणिकपणात असते. या अधिनियमात सर्वात मोठी 'मेख' मारली गेली आहे ती म्हणजे, जनगणनेची आणि त्यानंतरच्या मतदारसंघ फेररचनेची अट. सरकारला खरोखरच महिलांचे राजकीय सक्षमीकरण करायचे असते, तर ते आजच्या अस्तित्वात असलेल्या मतदारसंघांमध्येच आरक्षण लागू करू शकले असते. पण तसे केल्यास प्रस्थापित पुरुषी वर्चस्वाला धक्का लागला असता. हा 'राजकीय मृगजळ' दाखवण्याचा प्रकार असून, यात स्त्री-शक्तीला केवळ आश्वासनांच्या झुल्यावर झुलवत ठेवले गेले आहे. महिला आरक्षणाचा मुद्दा भारतीय संसदेसाठी नवा नाही. १९९६ मध्ये एच. डी. देवेगौडा यांच्या सरकारने जेव्हा हे विधेयक मांडले, तेव्हापासून आजपर्यंतचा प्रवास म्हणजे भारतीय पुरुषसत्तेच्या 'रेझिस्टन्स'चा इतिहास आहे. गीता मुखर्जी समितीने दिलेल्या शिफारसींपासून ते २०१० मध्ये राज्यसभेत मंजूर झालेल्या विधेयकापर्यंत, प्रत्येक वेळी हे विधेयक का रखडले? याचे उत्तर 'सामाजिक न्याय' या गोंडस नावाखाली दडलेल्या राजकीय असुरक्षिततेत आहे. आज जेव्हा हे विधेयक मंजूर झाले, तेव्हा ऐतिहासिक संदर्भ देणे सोयीचे वाटते. महिला आता केवळ गृहिणी राहिल्या नसून, त्या एक स्वतंत्र आणि निर्णायक 'व्होट बँक' बनल्या आहेत. या व्होट बँकेला चुचकारण्यासाठी केलेला हा 'सांविधानिक मलमपट्टी'चा प्रयत्न अधिक वाटतो. या कायद्यातील दुसरी मोठी त्रुटी म्हणजे 'इतर मागासवर्गीय' महिलांच्या उप-आरक्षणाचा अभाव. भारताच्या सामाजिक संरचनेत जात हे वास्तव नाकारता येत नाही. अनुसूचित जाती आणि जमातींच्या महिलांसाठी या कायद्यात स्थान आहे, पण ओबीसी महिलांना त्यातून वगळणे, हे या कायद्याच्या सर्वसमावेशकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. जोपर्यंत सत्तेचे वाटप हे सामाजिक स्तरावर शेवटच्या पायरीवर असलेल्या महिलेपर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत अशा आरक्षणाचे स्वरूप हे केवळ 'वरवरचे सक्षमीकरण' म्हणूनच राहील. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देऊन आता तीन दशके उलटली आहेत. तिथला अनुभव काय सांगतो? कायद्यात ३३ टक्के आकडा लिहिला म्हणजे महिलांचे नेतृत्व तयार होईल, हा भ्रम आहे. भारतात मात्र आजही महिलांना तिकीट देताना 'ती कोणाची नातेवाईक आहे' हा निकष 'ती किती सक्षम आहे' या निकषापेक्षा वरचढ ठरतो. जोपर्यंत भारतीय राजकारण 'विनेबिलिटी'च्या या पुरुषी निकषातून बाहेर पडत नाही, तोपर्यंत महिलांचे प्रतिनिधित्व हे केवळ कागदी आकडेमोडीचा भाग राहील. नारी शक्तीचा वंदन करण्यापेक्षा तिला खऱ्या अर्थाने 'सत्ता' देणे अधिक महत्त्वाचे आहे. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा भविष्यात कधीतरी उघडणाऱ्या सत्तेच्या तिजोरीची किल्ली आहे, जिची मालकी आजही प्रस्थापित पुरुषसत्तेच्याच खिशात सुरक्षित आहे. हा कायदा म्हणजे एका मोठ्या परिवर्तनाचा प्रारंभ असू शकतो, हे मान्य करायला हरकत नाही. पण तो प्रारंभच इतका लांबणीवर टाकला गेला आहे की, त्याची फलश्रुती पाहण्यासाठी पुढच्या पिढीला वाट पहावी लागेल. लोकशाहीत प्रतीकांना महत्त्व असते, पण केवळ प्रतीकांवर लोकशाहीची भूक भागत नाही. जोपर्यंत हा कायदा 'अंमलबजावणीच्या मृगजळा'तून बाहेर पडून वास्तवात येत नाही, तोपर्यंत तो एका 'ऐतिहासिक जाहिरातबाजी' पलीकडे काहीही नसेल. आजच्या घडीला तरी, हा अधिनियम म्हणजे वास्तवाचा अभाव असलेला आणि केवळ राजकीय लाभासाठी सजवलेला एक देखणा 'प्रतीकवाद' आहे. या सर्व पार्श्वभूमीवर एक प्रश्न उरतोच: अंमलबजावणीसाठी जनगणनेची अट घालणे ही खरोखर तांत्रिक गरज होती की राजकीय सोय?

# रुपया: किंमतीचा नव्हे, तर विश्वासाचा दर



**» रुपया हा फक्त विनिमयाचा दर नाही. तो अर्थव्यवस्थेवर जगाने ठेवलेल्या विश्वासाचा दर आहे. तेल, डॉलर आणि भांडवली प्रवाह यांच्या ताणात तो हलतो. पण तो कोणत्या संस्थात्मक विश्वासावर उभा आहे, हे महत्त्वाचे ठरते.**

रुपया घसरतो किंवा सावरतो, तेव्हा चर्चा नेहमीच आकड्यांभोवती फिरते. तेल महाग झाले, डॉलर मजबूत झाला, परकीय गुंतवणूक बाहेर गेली. हे सगळे घटक खरे आहेत. पण या सगळ्यांच्या पलीकडे एक मूलभूत प्रश्न असतो. बाजार भारताकडे पाहताना नेमके काय पाहतो? चलन हा केवळ आर्थिक संकेत नाही. तो रोजचा "विश्वासाचा निकाल" आहे. आणि तो निकाल कोणत्याही घोषणेतून येत नाही. तो बाजाराच्या सततच्या मूल्यांकनातून तयार होतो.

अलीकडील काळात रुपयावरचा दबाव सातत्याने जाणवत आहे. जागतिक तेल बाजारातील अस्थिरता, भू-राजकीय तणाव, आणि डॉलरची ताकद यामुळे हा दबाव अधिक तीव्र झाला आहे. पण बाह्य घटक जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच अंतर्गत घटकही आहेत. कारण चलन केवळ बाह्य धक्क्यांना प्रतिक्रिया देत नाही. ते अंतर्गत आर्थिक रचनेचे प्रतिबिंबही असते.

भारताची अर्थव्यवस्था मोठी आहे. वाढीचा वेगही लक्षणीय आहे. पण बाजार "मोठेपणा" पाहत नाही. तो "स्थैर्य" पाहतो. आणि स्थैर्य हे केवळ आकारावर ठरत नाही; ते संस्थांवर ठरते. रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपामुळे रुपया तात्पुरता सावरतो. पण हस्तक्षेप हा उपचार नसतो. तो आधार असतो. दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करणारे घटक वेगळे असतात. राजकोषीय शिस्त, धोरणांची सातत्यता, आणि गुंतवणूक वातावरणातील स्पष्टता. या तिन्ही घटकांवरच परकीय भांडवलाचा विश्वास उभा असतो.

भांडवल भावनांवर चालत नाही. ते अपेक्षांवर चालते. आणि अपेक्षा स्थैर्यावर आधारलेली असतात. त्यामुळे बाजाराचा प्रश्न नेहमी एकच असतो. हा देश अंदाज करता येण्याजोगा आहे का? उत्तर हो असेल, तर चलन स्थिर राहते. जर उत्तर नाही असेल, तर आकडे हलू लागतात. रुपयाच्या घसरणीकडे अनेकदा बाह्य कारण म्हणून पाहिले जाते. हे अंशतः योग्य आहे.

भारत ऊर्जा आयातदार देश आहे. त्यामुळे तेलदर वाढले, की चलनावर दबाव येतो. डॉलर मजबूत झाला, की रुपया कमकुवत होतो. हे सरळ आर्थिक गणित आहे. पण हे संपूर्ण सत्य नाही. कारण काही देशांवरही बाह्य धक्के येतात. पण त्यांची चलने तुलनेने स्थिर राहतात. कारण बाजार त्यांना "विश्वसनीय अर्थव्यवस्था" म्हणून मानतो. येथेच फरक निर्माण होतो. रुपया त्या टप्प्यावर अजून पूर्णपणे पोहोचलेला नाही.

चलन हा केवळ व्यापाराचा परिणाम नाही. तो संस्थात्मक विश्वासाचा प्रतिबिंब आहे. न्यायव्यवस्था, धोरणात्मक स्थैर्य, वित्तीय शिस्त आणि प्रशासनिक सातत्य—या सर्वांवर तो अवलंबून असतो. हे घटक मजबूत असतील, तर बाह्य धक्के शोषले जातात. ते कमकुवत असतील, तर प्रत्येक धक्का मोठा वाटतो. आज जग अस्थिर आहे. ऊर्जा बाजार, युद्ध परिस्थिती, आणि पुरवठा साखळीतील ताण हे नवे सामान्य झाले आहेत. अशा काळात चलन व्यवस्थापन अधिक कठीण होते. पण त्याच वेळी ते अधिक निर्णायकही ठरते. कारण अशा काळात बाजार "तुलना" करतो. कोणता देश स्थिर आहे, कोण अनिश्चित आहे, कोणाचा धोरणात्मक मार्ग स्पष्ट आहे—हे सर्व तो मोजतो.

रिझर्व्ह बँक या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावते. ती चलनाला स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करते. व्याजदर, परकीय चलन साठा, आणि बाजार हस्तक्षेप ही तिची साधने आहेत. पण केंद्रीय बँक मर्यादित असते. ती विश्वास निर्माण करू शकत नाही. ती केवळ त्या विश्वासाला आधार देऊ शकते. खरा विश्वास अर्थव्यवस्थेच्या संरचनेतून तयार होतो.

भारताने गेल्या दशकात अनेक सुधारणा केल्या आहेत. डिजिटल व्यवहार वाढले आहेत. कर प्रणाली अधिक पारदर्शक झाली आहे. वित्तीय समावेशन विस्तारले आहे. रुपयाची हालचाल ही केवळ आर्थिक घटना नाही. ती एक संदेश आहे. तो संदेश बाजार सतत पाठवत असतो. कधी तो सांगतो की भारत आकर्षक आहे. कधी तो सांगतो की भारत सावधगिरीचा विषय आहे. हा संदेश भावनिक नसतो. तो गणिती असतो. आणि म्हणूनच रुपया हा केवळ किंमतीचा निर्देशक नाही. तो विश्वासाचा दर आहे. जेव्हा विश्वास मजबूत असतो, तेव्हा चलन स्थिर राहते. जेव्हा विश्वास डळमळतो, तेव्हा चलन हलते.

या संदर्भात एक वास्तव स्पष्ट आहे. भारताची अर्थव्यवस्था वाढत आहे, पण तिच्या स्थैर्याची कथा अजून पूर्णपणे लिहिली गेलेली नाही. स्थैर्य ही आकड्यांची गोष्ट नाही. ती अपेक्षांची गोष्ट आहे. आणि अपेक्षा बदलायला वेळ लागतो. रुपयाच्या प्रत्येक हालचालीत हेच प्रतिबिंब दिसते. कधी बाह्य दबाव, कधी अंतर्गत अनिश्चितता, आणि कधी बाजाराची सावध भूमिका. पण या सगळ्यांच्या पलीकडे एकच प्रश्न कायम राहतो. हा देश किती विश्वासार्ह आहे? त्या प्रश्नाचे उत्तरच रुपयाचा दर ठरवतो. चलन घसरते किंवा सावरते ही गोष्ट महत्त्वाची नाही. महत्त्वाचा प्रश्न हा आहे की त्या चलनामागे विश्वास किती ठामपणे उभा आहे.

# मुख्य लेखा अधिकारी सक्तीच्या रजेवर

## नगरसेवकांवर कारवाईचा प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** बोगस उपसूचना स्वीकारून तब्बल ५२ कोटींपेक्षा अधिक रकमेची बिले ठेकेदारांना अदा केल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड महापालिकेत खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले असून, संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र, या उपसूचनांवर स्वाक्षरी करणाऱ्या नगरसेवकांवर आणि संबंधित ठेकेदारांवर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बोगस उपसूचनांच्या आधारे सुमारे ७० कामांची बिले ३० मार्च २०२६ रोजी रात्रीत अदा करण्यात आली. या प्रकरणी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी तक्रार दाखल करत प्रवीण जैन यांच्यावर निलंबन व फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

या उपसूचनांवर भाजप तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नगरसेवकांच्या सूचक व अनुमोदक म्हणून स्वाक्षऱ्या असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी केलेला "आमच्या पक्षाचा संबंध नाही" हा दावा फोल ठरत असल्याची चर्चा सुरू आहे. तसेच, या उपसूचना स्थायी समिती किंवा नगरसचिव विभागाकडे न जाता थेट लेखा व वित्त विभागाकडे सादर करण्यात आल्याचेही समोर आले आहे. संबंधित ठेकेदारांनी या उपसूचनांवर सह्या घेतल्याची बाबही उघड झाली आहे. या घोटाळ्याच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीची तिसरी बैठक पार पडली असून, मागील तीन वर्षांतील सर्व संबंधित कागदपत्रे समितीकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. सध्या या कागदपत्रांची छाननी सुरू असून, आयुक्तांनी सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी आपण ठेकेदारांच्या मागणीनुसार उपसूचनेवर सही केल्याचे मान्य केले. मात्र, त्या उपसूचना नियमानुसार पुढे न पाठवता थेट लेखा विभागाकडे गेल्या, ही बाब चुकीची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ठेकेदारांनी काम पूर्ण केल्याने त्यांना बिले मिळावीत, या उद्देशानेच सही केल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकरणामुळे सत्ताधारी पक्षातही मतभेद उघड झाले असून भाजपच्या कोअर कमिटी बैठकीत या विषयावर जोरदार चर्चा झाल्याची माहिती आहे. काहींनी पारदर्शक कारभाराची गरज व्यक्त केली, तर काहींनी पक्षाची नाहक बदनामी होत असल्याची खंत व्यक्त केली.

# एमआयडीसी परिसरातील अतिक्रमणांवर कारवाईचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** एमआयडीसी परिसरातील नाल्यांवर झालेल्या अतिक्रमणांमुळे नैसर्गिक जलप्रवाह बाधित होत असल्याची गंभीर बाब समोर आली असून, आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

पालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या बैठकीत त्यांनी एमआयडीसी परिसरातील नाल्यांची सद्यस्थिती, अतिक्रमणे आणि पाणी साचण्याच्या समस्यांचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीस एमआयडीसी आणि महापालिकेचे अधिकारी तसेच संबंधित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आयुक्तांनी सांगितले की, जुन्या नकाशांमध्ये दर्शविलेले अनेक नाले कंपन्यांकडून बुजविण्यात आले आहेत किंवा त्यावर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचणे, पूरस्थिती निर्माण होणे आणि उद्योग तसेच नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. एमआयडीसी, महापालिका आणि संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी संयुक्त पाहणी करून बुजविलेले व अतिक्रमित नाले तात्काळ ओळखण्याचे निर्देश देण्यात आले. नाल्यांवरील अतिक्रमण ही गंभीर बाब असून यामुळे संपूर्ण परिसराच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित कंपन्यांनी अतिक्रमण हटवून नाले पूर्वस्थितीत आणावेत, असेही आयुक्तांनी बजावले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील बालवाडी हा महत्त्वाचा टप्पा असून, या काळात आत्मविश्वास, सृजनशीलता आणि शिकण्याची आवड विकसित करणे आवश्यक आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असल्याचे शिक्षण समितीच्या सभापती रविना आंगोळकर यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड पालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने पीसीएमसी पब्लिक स्कूल, साई जीवन, जाधववाडी (कन्या व मुले शाळा क्र. ८७) येथे बालवाडीतून इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य राहुल जाधव, प्रशासन अधिकारी संगिता बांगर, मुख्याध्यापक जयश्री गळीतकर, मुख्याध्यापिका मृगनयनी चव्हाण, पर्यवेक्षक प्रमिला जाधव तसेच शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभापती आंगोळकर म्हणाल्या की, दीक्षांत समारंभ हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील प्रेरणादायी क्षण असून, पुढील शिक्षणाच्या प्रवासासाठी तो महत्त्वाचा टप्पा ठरतो. पालक, शिक्षक आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून विद्यार्थ्यांचा उज्ज्वल भविष्यकाळ घडवता येतो. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती जपून सातत्याने प्रगती साधावी, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धमेंद्र भांगे यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आज महामानव विश्वरत्न भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड शहरामध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शेजारी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर आज पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष सागर गोपाळ सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संघाच्या वतीने अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना तसेच बौद्ध भक्तांना पाणी बॉटल व अन्नदान म्हणून शिरा वाटप करण्यात आले.



या उत्सवी कार्यक्रमांमध्ये चिंचवडचे आमदार शंकर जगताप, सत्तारूढ नेते प्रशांत शितोळे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशी, डिजिटल मीडियाचे अध्यक्ष विनय सोनवणे, माजी डिजिटल मीडिया अध्यक्ष महावीर जाधव, डिजिटल मीडियाचे उपाध्यक्ष संतोष गोतावळे, हनुमंत रामदासी, सिद्धांत चौधरी, पत्रकार संभाजी बारबोले, अशोक कोकणे, रोहित जाधव आदी मान्यवरांनी या दानवाटप कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.

## युवकांना जागतिक संधींचे मार्गदर्शन

# आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून आंबेडकरी विचारांची मांडणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आजही भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देणारे ठरत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत झालेल्या परिसंवादात हे मत नोंदविण्यात आले.

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आणि डॉ. आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आणि सद्यस्थिती तसेच परदेशातील शिक्षण व रोजगार संधी' या विषयावर हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

परिसंवादात परदेशातून नंदू मोरे (बेल्जियम), डॉ. शैलेश कोळेकर (डेन्मार्क), रेवा रॉय (कॅनडा), विरेंद्र घुटके (स्वीडन) आणि धम्मचारी सुदिप्ता (इंग्लंड) यांनी दृकश्राव्य माध्यमातून सहभाग नोंदवला. तसेच प्रा. डॉ. संजय खोब्रागडे, प्रा. केशव वाघमारे, प्रा. डॉ. अशोक गायकवाड, प्रा. डॉ. नितीश नवसागरे, प्रा. रोनके राम आणि प्रा. विवेक कुमार हे उपस्थित होते. यावेळी महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे आणि विशेष अधिकारी किरण गायकवाड उपस्थित होते.

तज्ज्ञांनी सांगितले की, जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण आणि रोजगाराच्या नव्या संधी शोधताना व्यापक दृष्टीकोन आवश्यक आहे. प्रोग्राम मॅनेजमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, ॲनिमेशन आणि डेटा ऑटोमेशन या क्षेत्रांमध्ये मोठ्या संधी उपलब्ध असून, प्रभावी संवादकौशल्य जागतिक स्तरावर यशासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते.

परदेशातील शिक्षण घेताना येणाऱ्या आव्हानांवरही वक्त्यांनी प्रकाश टाकला. स्थानिक भाषा आत्मसात करणे, इंटर्नशिपद्वारे अनुभव मिळवणे आणि सातत्याने कौशल्यविकास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. बदलत्या जागतिक रोजगार बाजारात टिकून राहण्यासाठी अद्ययावत राहण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

वक्त्यांनी पुढे नमूद केले की, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांमुळे सामाजिक न्याय, समता आणि मानवाधिकार यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक बळ मिळते. युवकांनी संशोधन आणि शिक्षणाच्या माध्यमातून जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण करावी आणि वंचित घटकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडावेत, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त अण्णा बोदडे यांनी केले.

# हंडाभर पाण्यासाठी वणवण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** एकीकडे मावळ तालुक्यात 'जलजीवन मिशन' अंतर्गत घरोघरी पाणी पोहोचविण्याचे काम सुरू असताना, दुसरीकडे लोणावळ्यासारख्या आंतरराष्ट्रीय पर्यटननगरीच्या अगदी जवळच असलेल्या फणसराई वस्तीवर भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढताच येथील नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी ४ ते ५ किलोमीटरची पायपीट करावी लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरापासून अवघ्या ७ ते ८ किलोमीटर अंतरावर, तसेच प्रसिद्ध पर्यटनस्थळांच्या जवळ फणसराई ही वस्ती वसलेली आहे. येथे प्रामुख्याने १८ ते २० धनगर आणि कातकरी कुटुंबे, म्हणजे सुमारे १०० लोकसंख्या वास्तव्यास आहे. राजमाची किल्ल्याच्या मार्गावर असलेल्या या वस्तीत एका सामाजिक संस्थेने खोदलेल्या विहिरीमुळे वर्षातील ८ ते १० महिने पाण्याची सोय होत होती. यंदा मार्च अखेरच विहिरीने तळ गाठल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. पाण्याचा स्रोत आटल्याने महिला आणि पुरुषांना डोंगराच्या पलीकडे असलेल्या धरणावरून पाणी आणावे लागत आहे. डोक्यावर पाण्याचे हंडे घेऊन उंच-सखल डोंगरदऱ्यांतून चालणे हे अत्यंत जिकिरीचे काम असून, दरवर्षी उन्हाळ्यात नागरिकांना हीच कसरत करावी लागते. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची सोय करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वादातून वॉचमनवर जीवघेणा हल्ला

**फुरसुंगी :** शेजारील बांधकामाच्या किरकोळ वादातून फुरसुंगी (ता. हवेली) परिसरात वॉचमनवर लोखंडी सळईने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी (ता. ११) सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शुभम नेटके (वय २४) आणि त्याचा साथीदार शंभू हंबीर यांच्याविरुद्ध फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनेश शंकरराव वाळंजकर (वय ५०, रा. आशीर्वाद नगर, फुरसुंगी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादी वाळंजकर हे कुटुंबासह आशीर्वाद नगर येथे वास्तव्यास असून वॉचमन म्हणून काम करतात. त्यांच्या शेजारी राहणाऱ्या शुभम नेटके याच्या घराचे बांधकाम सुरू होते. बांधकामाच्या सीमारेषेवरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता.

### जमिनीच्या वादातून दोन गटांत हाणामारी

**उरुळी कांचन :** हवेली तालुक्यातील वळती गावच्या हद्दीतील 'वरचा मळा' परिसरात जमिनीच्या वाटपावरून आणि बांधावरील झाडांच्या जुन्या वादातून दोन गटांत जोरदार हाणामारी झाल्याची घटना घडली. या प्रकारात महिलांनाही मारहाण करण्यात आल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी विनयभंग, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोन्ही गटांतील एकूण ८ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून अरविंद मच्छिंद्र कुंजीर, वैषाली अरविंद कुंजीर, सृष्टी अरविंद कुंजीर आणि अजित भिसे यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तर दुसऱ्या घटनेत अरविंद कुंजीर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार संभाजी एकनाथ कुंजीर, शैला संभाजी कुंजीर (दोन्ही रा. वळती, ता. हवेली), तसेच दिनेश शांताराम म्हस्के आणि उमेश शांताराम म्हस्के (दोन्ही रा. डाळींब, ता. दौंड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

उन्हाच्या कडाक्यातही भाविकांची मोठी गर्दी

# वरुथिनी एकादशीला मंदिरात पुष्पसजावट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** वरुथिनी एकादशी निमित्त तीर्थक्षेत्र आळंदी येथे विविध धार्मिक कार्यक्रमांच्या उत्साहात साजरी झाली. उन्हाचा पारा वाढलेला असतानाही श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. सुमारे दीड ते दोन तास रांगेत थांबून भाविकांनी दर्शन घेतल्याचे सांगितले.

एकादशी निमित्त मंदिरातील गाभाऱ्यात आकर्षक पुष्पसजावट करण्यात आली होती. हरिनाम गजर, हरिपाठ, कीर्तन, हरीजागर यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले होते. ह.भ.प. संतोष मोझे यांच्या वतीने हरीजागर सेवा पार पडली. तसेच देहूकरांचे कीर्तन, प्रवचन सेवा यांनाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन देवस्थान प्रशासनाने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था थेट दर्शनबारीत केली होती. उन्हाचा त्रास कमी व्हावा यासाठी नियोजन करण्यात आले होते.

कमी वेळेत अधिकाधिक भाविकांना दर्शन देता यावे यासाठी व्यवस्थापक माऊली वीर, तुकाराम माने तसेच सेवकांनी विशेष प्रयत्न केले.

दरम्यान, इंद्रायणी नदी घाटावर भाविकांनी मोठ्या संख्येने स्नान करून तीर्थस्नानाचा लाभ घेतला. आळंदी देवस्थान आणि इंद्रायणी आरती सेवा समितीच्या वतीने स्वतंत्र आरती सोहळे पार पडले. हरिनामाच्या गजरात इंद्रायणी आरती उत्साहात झाली. एकादशी निमित्त सिध्दबेट येथे आळंदी नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता अभियानही राबविण्यात आले. या उपक्रमात स्थानिक पदाधिकारी व नागरिकांनी सहभाग घेतला.

दिवसभर मंदिरात काकडा आरती, अभिषेक, महाप्रसाद, प्रवचन, कीर्तन, धुपारती अशा विविध धार्मिक विधी पार पडले. काही वेळेस महापूजा आणि आरतीदरम्यान दर्शन बंद ठेवण्यात आले होते. एकादशीचा हा सोहळा भक्तिभाव, शिस्तबद्ध नियोजन आणि धार्मिक उत्साहात संपन्न झाला.

---

## शिंगवे येथे यात्रेनिमित्त कार्यक्रमांची रेलचेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील शिंगवे येथे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज व माता जोगेश्वरी यांच्या यात्रेनिमित्त गुरुवार (दि. १६) व शुक्रवार (दि. १७) रोजी विविध धार्मिक, पारंपरिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामस्थांच्या सहभागातून ही यात्रा उत्साहात पार पडणार आहे.

यात्रेची सुरुवात गुरुवारी पहाटे देवपूजा व अभिषेकाने होणार असून, सकाळी ७ वाजता मांडव डहाळे कार्यक्रम पार पडेल. त्यानंतर सकाळी ९ वाजता गावातून झेंड्याची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

यानंतर यात्रेतील मुख्य आकर्षण ठरणाऱ्या बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतीत प्रथम क्रमांकासाठी ५५ हजार ५५५ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ४४ हजार ४४४ रुपये, तृतीय क्रमांकासाठी २२ हजार २२२ रुपये आणि चतुर्थ क्रमांकासाठी ११ हजार १११ रुपये अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तसेच अंतिम फेरीसाठी प्रथम ९ हजार, द्वितीय ८ हजार, तृतीय ७ हजार आणि चतुर्थ ६ हजार रुपये अशी आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामुळे या शर्यतीकडे परिसरातील शेतकरी व बैलगाडा शौकिनांचे लक्ष लागले आहे.

शुक्रवारी (दि. १७) सकाळी १० वाजता शाहीर बाळासाहेब पवार आणि शाहीर मारुती भुजबळ (आळेफाटा) यांच्यात पारंपरिक 'कलगी-तुरा' लोककलेचा सामना रंगणार आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने रसिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर रात्री १० वाजता संध्या माने यांचे चिरंजीव रोहन माने (सोलापूरकर) यांच्या लोकनाट्य तमाशा मंडळाचा कार्यक्रम सादर होणार असून, यात्रेचा समारोप रंगतदार सांस्कृतिक सादरीकरणाने होणार आहे.

---

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती खडकवाडीत उत्साहात साजरी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवाला अभिवादन केले.

कार्यक्रमात माजी सरपंच अनिल डोके यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या मूल्यांवर भाष्य करत आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य आणि त्या स्वराज्याला न्यायव्यवस्थेची चौकट देणारी राज्यघटना ही बाबासाहेबांची देणगी असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी ह.भ.प. नितीन महाराज सुक्रे, माजी सरपंच कमल सुक्रे आणि ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब तळेकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन गणेश पंचरास आणि सहकाऱ्यांनी केले.

या प्रसंगी उपसरपंच आदिनाथ सुक्रे, श्रीराम वाळुंज, दादाभाऊ वाळुंज, तसेच महिला भगिनींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोणी, धामणी आणि वडगावपीर येथेही जयंती साजरी करून अभिवादन करण्यात आले.

---

# वाडा रस्त्यावर वाहतूक कोंडीचा विळखा

अतिक्रमण आणि पार्किंगमुळे नागरिक हैराण



छायाचित्र: निखिल पाचारणे, राजगुरुनगर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** शहरातील वाडा रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत असून सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी आणि पालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दोन वर्षांपूर्वी रुंदीकरण व कॉंक्रीटीकरण करून सुशोभीकरण करण्यात आलेला हा रस्ता सध्या अतिक्रमण आणि अनधिकृत पार्किंगमुळे पुन्हा अरुंद झाल्याचे चित्र दिसत आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना टपऱ्या, हातगाड्या आणि बेकायदेशीर वाहन पार्किंगमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. फुटपाथवर व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. परिसरात शाळा, क्लासेस, पंचायत समिती, बँका आणि शासकीय कार्यालये असल्याने दिवसभर वर्दळ असते. त्यातच लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर चारचाकी वाहनांची संख्या वाढल्याने कोंडी अधिकच तीव्र होत आहे. एसटी बस आणि चाकण एमआयडीसीकडे जाणाऱ्या जड वाहनांना या मार्गावरून मार्गक्रमण करताना अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. नागरिकांनी सूचना केल्यास काही वाहनचालकांकडून वाद घालण्याच्या घटना घडत असल्याचेही समोर आले आहे.

या संदर्भात नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी सांगितले की, शहरात नवीन टपऱ्यांना बंदी असून अनधिकृत अतिक्रमणावर लवकरच कारवाई केली जाईल. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिस प्रशासनाला पत्र देण्यात येणार असून रस्त्यावर पार्किंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

---

# खामुंडीत प्री-वेडिंग शूटला 'ब्रेक'




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील खामुंडी येथील निसर्गरम्य परिसरात वसलेल्या श्री काळभैरवनाथ मंदिरात प्री-वेडिंग शूट करणाऱ्यांना आता शुल्क भरावे लागणार आहे. मंदिराचे पावित्र्य आणि शिस्त अबाधित ठेवण्यासाठी देवस्थान ट्रस्टने प्री-वेडिंग चित्रीकरणासाठी २ हजार रुपये शुल्क अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे.

देवस्थान ट्रस्टच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मंदिर परिसरात वाढत्या प्रमाणात प्री-वेडिंग शूट्स होत असल्याने धार्मिक वातावरणाला बाधा येत असल्याच्या तक्रारी भाविकांकडून करण्यात आल्या होत्या. याची दखल घेत ट्रस्टने नियमावली लागू केली आहे. मंदिराची आकर्षक वास्तुरचना, शांत परिसर आणि निसर्गसौंदर्यामुळे अनेक जोडपी येथे चित्रीकरणासाठी येत आहेत. मात्र, काही ठिकाणी शिस्तभंगाच्या घटनांमुळे पावित्र्यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले होते. नवीन नियमानुसार, चित्रीकरणासाठी २ हजार रुपये शुल्क भरून अधिकृत पावती घेणे बंधनकारक राहणार आहे. पावतीशिवाय चित्रीकरणास सक्त मनाई करण्यात आली असून नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. गरज भासल्यास पोलिसांची मदतही घेतली जाणार आहे. देवस्थान ट्रस्टने भाविकांना मंदिराचे पावित्र्य राखण्याचे आवाहन केले असून या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

---

## भेसळयुक्त मँगो पल्पचा मोठा साठा जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** राक्षेवाडी (ता. खेड) येथे अन्न व औषध प्रशासनाने सोमवारी (दि. १३) छापा टाकत भेसळयुक्त मँगो पल्पचा मोठा साठा जप्त केला. खेड व मावळ तालुक्यातील या कारवाईत एकूण ३,८०० किलोहून अधिक पल्प जप्त करण्यात आला असून, त्याची किंमत अडीच लाख रुपयांहून अधिक असल्याचा अंदाज आहे.

गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तपासात उघड झाल्यानुसार, मँगो पल्प तयार करताना खऱ्या आंब्याऐवजी भेसळयुक्त पदार्थ, गाईचे दूध आणि केमिकलयुक्त कृत्रिम केशरी रंगाचा वापर करण्यात येत होता. स्वस्त दरामुळे हा पल्प ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विकला जात असून स्थानिक हॉटेल्स, मिठाई दुकाने तसेच घरगुती वापरासाठी पुरवठा केला जात होता.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, अशा भेसळयुक्त पल्पमुळे जुलाब, उलट्या, पोटदुखी आणि अन्नातून विषबाधा होण्याचा धोका संभवतो. दीर्घकाळ सेवन केल्यास कर्करोगासारख्या गंभीर आजारांचाही धोका वाढू शकतो. कारवाईदरम्यान जप्त केलेल्या पल्पचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून संबंधित उत्पादकांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

---

## आंबेगावात कांदा काढणी अंतिम टप्प्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात रब्बी हंगामातील कांदा काढणीची कामे अंतिम टप्प्यात आली असून, या कामांसाठी विविध जिल्ह्यांतून आलेले शेतमजूर आता हळूहळू आपल्या गावी परतू लागले आहेत. या भागात कांद्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जात असल्याने काढणीच्या हंगामात दरवर्षी मजुरांची टंचाई भासते.

ही गरज लक्षात घेऊन गेल्या चार-पाच वर्षांपासून यवतमाळ, परभणी, वाशिम आदी जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने मजूर आंबेगाव तालुक्यात दाखल होत आहेत. यंदाही मोठ्या प्रमाणावर मजुरांची उपस्थिती होती. मात्र, पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचा कांदा भिजल्याने संभाव्य नुकसान टाळण्यासाठी काढणीची कामे तातडीने पूर्ण करण्यात आली. सध्या बहुतांश ठिकाणी काढणी पूर्ण झाली असून, काढलेला कांदा सुरक्षित ठेवण्यासाठी 'बराकी' म्हणजेच कांदा चाळींमध्ये साठवणूक सुरू आहे. त्यामुळे शेतकरी आणि मजूर या दोघांच्याही कामाचा ताण आता कमी झाला आहे.

काढणीची कामे संपत आल्याने परप्रांतीय मजूर परतीच्या मार्गावर आहेत. "जानेवारी ते एप्रिल-मे या कालावधीत कांदा काढणीमुळे आम्हाला चांगला रोजगार मिळतो. यंदा जोडीमागे सुमारे १२०० रुपये मजुरी मिळाली, तर एका एकरासाठी १३ ते १४ हजार रुपये मिळाले," अशी माहिती काही मजुरांनी दिली.

दरम्यान, आपल्या गावी सुरू झालेल्या ग्रामदैवतांच्या यात्रा-जत्रांचा हंगाम हेही मजूर परतण्यामागील एक महत्त्वाचे कारण असल्याचे सांगितले जात आहे. रोजगारासोबतच पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांनाही उपस्थित राहण्यासाठी मजूर गावी परतत आहेत.

---

एक लाख अठ्ठावीस हजारांसह मानाची गदा पटकावली

# राहुल फुलमाळी ठरला 'पिंपळवंडी केसरी'

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**जुन्नर :** पिंपळवंडी येथील ग्रामदैवत मळगंगा देवीच्या यात्रा उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्त्यांच्या जंगी आखाड्यात स्थानिक पहिलवान राहुल फुलमाळी याने बाजी मारत 'पिंपळवंडी केसरी'चा मान पटकावला. त्याला एक लाख अठ्ठावीस हजार रुपये रोख पारितोषिकासह मानाची गदा प्रदान करण्यात आली.

तीन दिवस चाललेल्या यात्रा उत्सवाच्या अखेरच्या दिवशी, रविवारी (दि. १२) कुस्त्यांचा जंगी आखाडा रंगला होता. या स्पर्धेत राज्यभरातील नामांकित पहिलवानांनी सहभाग घेतला होता. कुस्त्यांसाठी शंभर रुपयांपासून ते एक लाख अठ्ठावीस हजार रुपयांपर्यंतची बक्षिसे ठेवण्यात आली होती. लक्ष्मण फुलमाळी व शाम फुलमाळी यांच्या वतीने गदा व नऊ ढालींचेही मानचिन्ह देण्यात आले.

अंतिम लढत संभाजीनगर येथील पहिलवान संतोष राजपूत आणि पिंपळवंडीच्या राहुल फुलमाळी यांच्यात झाली. या रंगतदार कुस्तीत राहुल फुलमाळी याने सरशी साधत विजेतेपद पटकावले.

या वेळी आमदार शरद सोनवणे, योगेश लेंडे, कुलदीप काकडे, संतोष वाघ, सुनील रोहकले, डॉ. मनोज काचळे, प्रकाश घोटणे, संदीप भोईटे, प्रदीप लेंडे, राजू गायकवाड, अशोक लेंडे, आशिष कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शरदराव लेंडे, भाजप नेत्या आशाताई बुचके, संतोषनाना खैरे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक बाळासाहेब काकडे, माजी सरपंच शिवाजी काकडे आदींच्या हस्ते कुस्त्यांचा शुभारंभ झाला.

या आखाड्यात पंच म्हणून भालचंद्र कारंडे, दीपक गायकवाड आणि भाऊसाहेब काकडे यांनी काम पाहिले. यात्रा कमिटीचे अध्यक्ष विवेक काकडे, बैलगाडा कमिटीचे अध्यक्ष दत्ता टाकळकर, कुस्ती आखाडा कमिटीचे अध्यक्ष अजित लेंडे आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले.

---

## मंचर बाजार समितीत भाजीपाल्याच्या दरात घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** गॅस टंचाईमुळे ग्राहकांची खरेदी कमी झाल्याने मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत भाजीपाला व फळभाज्यांच्या बाजारभावात घसरण झाल्याचे चित्र दिसून आले. आज बाजारात एकूण ७,९९१ डाग इतकी भाजीपाल्याची आवक झाली, अशी माहिती बाजार समितीचे सभापती निलेश थोरात यांनी दिली.

लिंबूला दहा किलोसाठी ४०० ते ११०० रुपये, तर वाटाण्याला १०० ते ९०० रुपये दर मिळाला. हिरवी मिरची ७० ते ५८१ रुपये, लसूण २०० ते ५०० रुपये, टोमॅटो ७० ते २७० रुपये, तर फ्लॉवरला केवळ १० ते १०० रुपये दर मिळाला. इतर भाजीपाल्यात बीट २० ते २०१, घेवडा २०० ते ६००, चवळी १२० ते ३७०, ढोबळी मिरची ८० ते ३५०, भेंडी ८० ते ४०१, फरशी ५० ते ५००, तोंडली ८० ते ४३०, काकडी १० ते १५०, वांगी १५ ते १५०, दुधी भोपळा २० ते १३० असे दर राहिले. तसेच आले १५० ते ४००, मका ७० ते १२०, वालवड ४२० ते ४७०, गाजर ८० ते १५०, बटाटा २० ते १५०, कोबी २० ते ५०, शेवगा १०० ते ४३०, दोडका २० ते २२०, कारले १०० ते ४००, कैरी १५० ते ४००, गवार ५० ते ६०० असे दर नोंदवले गेले. आवक काही प्रमाणात घटली असली तरी ग्राहकांची कमतरता असल्याने दरात घसरण झाली आहे, असे बाजार समितीचे उपसभापती सचिन पानसरे यांनी स्पष्ट केले.

## सारांश वृत्त

### पंतप्रधान मोदी १५ तारखेला कर्नाटकात

**बंगळूरः** पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ एप्रिल रोजी कर्नाटक दौऱ्यावर येण्याची शक्यता असून, या दौऱ्यात मंड्या जिल्ह्यातील एका अधिकृत कार्यक्रमाचा समावेश आहे. येथील भाजप नेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान विमानाने सकाळी ७.१५ वाजता दिल्लीहून निघण्याची आणि सकाळी १०.०५ वाजता बंगळूरु येथील एचएएल विमानतळावर पोहोचण्याची शक्यता आहे.

### भारतासोबत संबंध सुधारणार : चीन

**बीजिंग** : चीनने मंगळवारी सांगितले की, भारतासोबत संबंध सुधारण्याचे त्याचे धोरण बदललेले नाही आणि अरुणाचल प्रदेशातील विविध प्रदेशांची नवीन नावे प्रसिद्ध करण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन केले. भारताने रविवारी भारतीय भूभागाला "बनावट नावे" देण्याच्या चीनच्या प्रयत्नांना स्पष्टपणे फेटाळून लावले. "निराधार कथानके" तयार करण्याचे असे प्रयत्न "अखंडनीय वास्तवाला" बदलू शकत नाहीत आणि द्विपक्षीय संबंध सामान्य करण्याच्या प्रयत्नांना खीळ घालू शकतात, असे भारताने ठामपणे सांगितले. भारताने आपला सार्वभौम प्रदेश म्हणून जपलेल्या अक्साई चिनमध्ये बीजिंगने तिसरा नवीन प्रशासकीय जिल्हा स्थापन केल्याच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीने तीव्र प्रतिक्रिया दिली.

### मध्य प्रदेशातील दाम्पत्याचा मृत्यू

**जम्मू** : मंगळवारी येथे जम्मूजवळ एका मोटारसायकलची ट्रकला धडक बसल्याने एका दाम्पत्याचा मृत्यू झाला आणि त्यांचा १२ वर्षांचा मुलगा जखमी झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मध्य प्रदेशातील छतरपूरचे रहिवासी असलेले बाल कृष्ण (४५) आणि त्यांची पत्नी अनिता (४०) हे त्यांच्या मुलासह मोटारसायकलने प्रवास करत असताना गंग्याल बायपासवर त्यांना एका ट्रकने धडक दिली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, गंग्यालच्या मॉडेल टाऊनमध्ये भाड्याच्या घरात राहणाऱ्या त्या जोडप्याचा जागीच मृत्यू झाला आणि त्यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात हलवण्यात आले.

## पश्चिम आशियातील संघर्षाचा भारतावर परिणाम

# 25 लाख नागरिक गरिबीत जाण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) च्या नव्या अहवालात पश्चिम आशियातील सुरू असलेल्या लष्करी संघर्षाचे भारतासह आशिया-पॅसिफिक प्रदेशावर गंभीर आर्थिक आणि सामाजिक परिणाम होण्याचा इशारा देण्यात आला आहे. वाढत्या इंधनदर, मालवाहतूक खर्च आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे भारतात सुमारे २५ लाख लोक गरिबीत ढकलले जाऊ शकतात, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

'मध्य पूर्वेतील लष्करी संघर्ष: आशिया आणि पॅसिफिकमधील मानवी विकासावरील परिणाम' या अहवालात नमूद केल्याप्रमाणे, या संघर्षामुळे कुटुंबांची क्रयशक्ती घटत असून अन्नसुरक्षेचा प्रश्न अधिक तीव्र होत आहे. सार्वजनिक अर्थसंकल्पांवर ताण वाढत असून सर्वसामान्यांच्या उपजीविकेवर परिणाम होत आहे.



प्राथमिक अंदाजानुसार, या संघर्षामुळे जागतिक स्तरावर सुमारे ८८ लाख लोक गरिबीत ढकलले जाऊ शकतात. यापैकी दक्षिण आशियाचा वाटा सर्वाधिक राहण्याची शक्यता असून, भारतात गरिबीचा दर २३.९ टक्क्यांवरून २४.२ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सुमारे २४.६ लाख नागरिक नव्याने गरिबीत जाऊ शकतात. अहवालानुसार, भारताची अर्थव्यवस्था ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. देशाच्या कच्च्या तेलाच्या ४० टक्क्यांहून अधिक आणि एलपीजीच्या सुमारे ९० टक्के आयातीसाठी पश्चिम आशियावर अवलंबित्व आहे. तसेच खतांच्या आयातीपैकी ४५ टक्के पुरवठा याच प्रदेशातून होत असल्याने संघर्षाचा थेट परिणाम शेती आणि उत्पादन क्षेत्रावरही होऊ शकतो.

मानवी विकास निर्देशांक बाबतही चिंताजनक चित्र समोर आले आहे. संघर्षामुळे भारताच्या एचडीआय प्रगतीत ०.०३ ते ०.१२ वर्षांची घसरण होण्याचा अंदाज आहे. इराणसारख्या देशांमध्ये ही घसरण आणखी गंभीर स्वरूपाची असू शकते. ऊर्जेच्या किमती वाढल्याने भारतासह काही देशांनी पुन्हा कोळशावर आधारित वीज निर्मितीकडे वळण्यास सुरुवात केल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामुळे पर्यावरणीय उद्दिष्टांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय, व्यापार आणि पुरवठा साखळीमध्ये मोठे व्यत्यय निर्माण झाले असून मालवाहतूक अधिभार, विमा खर्च आणि वितरणातील विलंब यामुळे उद्योग क्षेत्रावर ताण वाढत आहे. भारताच्या निर्यातीमध्ये पश्चिम आशियाचा सुमारे १४ टक्के वाटा असून, बासमती तांदूळ, चहा, दागिने आणि वस्त्र निर्यातीवर याचा परिणाम होऊ शकतो.

पश्चिम आशियातील संघर्ष केवळ भू-राजकीय प्रश्न न राहता तो भारतासारख्या विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था, मानवी विकास आणि दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करणारा ठरत असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

## आयकर कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आयकर कर्मचारी महासंघ आणि आयकर राजपत्रित अधिकारी संघटना या दोन प्रमुख संघटनांनी केंद्र सरकारला इशारा देत, प्रलंबित मागण्यांवर तातडीने तोडगा न निघाल्यास १६ एप्रिलपासून टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे.

या दोन्ही संघटनांचा समावेश असलेल्या संयुक्त कृती परिषदेने केंद्रीय अर्थ मंत्रालयाअंतर्गत महसूल सचिवांना पत्र पाठवून विभागातील कामकाजाच्या "असुरक्षित" परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संघटना आयकर विभागातील सुमारे ९७ टक्के कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करतात.

पत्रात केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळवर "सततच्या उदासीनते"चा आरोप करत दहा प्रलंबित मुद्दे मांडण्यात आले आहेत. करिअर प्रगतीतील अडथळे, पदोन्नतीतील अनिश्चितता, वारंवार होणाऱ्या बदल्या, वाढता कामाचा ताण, अवास्तव उद्दिष्टे आणि मनुष्यबळ तसेच पायाभूत सुविधांची कमतरता यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण झाल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

जीसीएच्या मते, विभागातील संवर्ग पुनरावलोकनाची प्रक्रिया मागील १३ वर्षांपासून प्रलंबित असून ती अद्याप अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. या विलंबामुळे विभागाच्या कार्यक्षमतेवर आणि करदात्यांना दर्जेदार सेवा देण्याच्या क्षमतेवर परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संघटनांनी १६ एप्रिलपासून सात टप्प्यांचा आंदोलन कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये दुपारच्या सुटीत निदर्शने, त्यानंतर 'काळे बिल्ले' लावणे, सांख्यिकी अहवाल सादर न करणे आणि १३ मे रोजी एकदिवसीय संपाचा समावेश आहे. आयकर विभागातील वाढता कामाचा ताण आणि प्रलंबित प्रशासकीय मुद्दे यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढला असून, याचा परिणाम आगामी काळात महसूल व्यवस्थेवरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## ममता बॅनर्जी यांचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका करत 'तार्किक विसंगती' ही संज्ञा अधिकृत नसल्याचा दावा केला. निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान ही संज्ञा वापरून राज्यात केवळ भाजपला फायदा करून देण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी केला.

पश्चिम मेदिनीपूर जिल्ह्यातील पिंगला येथे झालेल्या निवडणूक सभेत बोलताना ममता बॅनर्जी यांनी मतदारांना भाजपविरोधात मतदान करण्याचे आवाहन केले. "तुमच्याकडून सर्व काही हिसकावून घेतल्याचा सूड उगवण्याचा हाच एक मार्ग आहे," असे त्या म्हणाल्या. सभेदरम्यान त्यांनी आणखी एक गंभीर आरोप केला. उत्तर प्रदेश आणि बिहारशी थेट रेल्वे जोडणी असलेल्या भागांत भाजप सभा घेत असून, बाहेरील राज्यांतून लोकांना आणून सभास्थळे भरवली जात असल्याचा दावा त्यांनी केला. यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी सूचित केले. सर्वोच्च न्यायालय यांनीही सोमवारी 'तार्किक विसंगती' या नव्या श्रेणीबाबत तोंडी निरीक्षण नोंदवले होते. या श्रेणीमुळे निवडणूक आयोगाने इतर राज्यांमध्ये अवलंबलेल्या एसआयआर प्रक्रियेपासून विचलन केल्याचे दिसत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. या वादग्रस्त प्रक्रियेनंतर पश्चिम बंगालच्या मतदार यादीतून सुमारे ९० लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याचे समोर आले आहे. यापैकी जवळपास ३४ लाख प्रकरणे सध्या न्यायाधिकरणांसमोर प्रलंबित आहेत, ज्यामुळे निवडणूक व्यवस्थेवर दबाव वाढला आहे.

२९४ सदस्यीय पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुका २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत पार पडणार असून, मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

## आंदोलनाच्या रेट्यानंतर किमान वेतनवाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ/नोएडा** : उत्तर प्रदेश सरकारने औद्योगिक पट्ट्यातील वाढत्या कामगार असंतोषाच्या पार्श्वभूमीवर किमान वेतनात महत्त्वपूर्ण वाढ जाहीर केली आहे. नोएडा-गाझियाबाद औद्योगिक क्षेत्रातील सर्व प्रवर्गातील कामगारांसाठी सुधारित अंतरिम वेतन दर १ एप्रिलपासून लागू करण्यात येणार आहेत.

मेधा रूपम, जिल्हाधिकारी, गौतम बुद्ध नगर यांनी सांगितले की, उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनंतर मुख्यमंत्री स्तरावर या निर्णयाला अंतिम मंजुरी देण्यात आली. नवीन दरानुसार, नोएडा आणि गाझियाबादमध्ये अकुशल कामगारांचे मासिक वेतन ११,३१३ रुपयांवरून वाढवून १३,६९० रुपये करण्यात आले आहे. अर्धकुशल कामगारांना १५,०५९ रुपये, तर कुशल कामगारांना १६,८६८ रुपये वेतन मिळणार आहे.



इतर महानगरपालिका क्षेत्रांमध्ये अकुशल कामगारांसाठी १३,००६ रुपये, अर्धकुशलांसाठी १४,३०६ रुपये आणि कुशलांसाठी १६,०२५ रुपये वेतन निश्चित करण्यात आले आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे १२,३५६ रुपये, १३,५९१ रुपये आणि १५,२२४ रुपये असे दर राहतील.

हा निर्णय नुकत्याच झालेल्या तीव्र कामगार आंदोलनानंतर घेण्यात आला आहे. विशेषतः नोएडातील फेज-२, सेक्टर ६०, तसेच सेक्टर ४०, ८५ आदी भागांमध्ये कामगारांनी मोठ्या प्रमाणावर निदर्शने केली होती. वेतनवाढीच्या मागणीसाठी अनेक औद्योगिक युनिट्समधील कामगार रस्त्यावर उतरले होते.

आंदोलनादरम्यान काही ठिकाणी परिस्थिती चिघळून हिंसाचाराच्या घटना घडल्या. दगडफेक, तोडफोड आणि जाळपोळीमुळे वाहनांचे नुकसान झाले तसेच वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत झाली. काही भागांत रस्ते अडवून घोषणाबाजी करण्यात आली. मदरसन, रिचा ग्लोबल, रेनबो, पॅरामाउंट, एसएनडी आणि अनुभव यांसारख्या औद्योगिक कंपन्यांतील हजारो कामगार गेल्या काही दिवसांपासून आंदोलनात सहभागी झाले होते. प्रशासनाच्या मते, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात केला होता.

## 'राज्यहिताला धक्का बसल्यास आंदोलन'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेवरून एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारला कडक इशारा दिला आहे. दक्षिणेकडील राज्यांवर विषम परिणाम झाला किंवा राज्याच्या हिताला बाधा पोहोचल्यास व्यापक आंदोलन छेडले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



१६ एप्रिलपासून होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी 'एक्स'वरील व्हिडिओ संदेशातून ही भूमिका मांडली. महिलांसाठी एक-तृतीयांश आरक्षण लागू करण्यासंदर्भातील नारी शक्ती वंदन अधिनियम, २०२३ आणि त्यासाठी आवश्यक सीमांकन प्रक्रियेवर त्यांनी आक्षेप घेतला.

स्टॅलिन म्हणाले, केंद्र सरकार मतदारसंघ पुनर्रचनेवरील घटनादुरुस्ती घाईघाईने मंजूर करण्याच्या प्रयत्नात आहे. तामिळनाडू व पश्चिम बंगालमधील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विशेष अधिवेशन बोलावल्यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या विषयावर प्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह राजकीय पक्षांना एकत्र आणून चेन्नईत संयुक्त कृती समितीची बैठक घेतल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधानांना भेटून चिंता मांडण्यासाठी वेळ मागितला होता, मात्र तो नाकारण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. मतदारसंघ पुनर्रचना ही लोकशाही व राज्यांच्या अधिकारांवर आघात असल्याचे सांगत, या प्रक्रियेची रूपरेषाही स्पष्ट नसल्याची टीका त्यांनी केली. दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाचे धोरण राबवले, मात्र आता त्याचाच फटका बसत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## टीएमसी-भाजपवर राहुल गांधींचा दुहेरी हल्ला

# बंगालमध्ये उद्योग उद्ध्वस्त



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : राहुल गांधी यांनी पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांच्यावर उद्योगधंदे उद्ध्वस्त केल्याचा आरोप करत जोरदार टीका केली. राज्यातील उद्योगांना "दुहेरी फटका" बसत असल्याचे ते म्हणाले.

रायगंज येथे आयोजित निवडणूक सभेत बोलताना गांधी यांनी दावा केला की, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली राज्यात कारखाने बंद पडले, तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या औद्योगिक रचनेलाच धक्का देत आहेत. "एकेकाळी बंगाल हे देशाचे औद्योगिक केंद्र होते. मात्र कम्युनिस्ट आणि तृणमूल काँग्रेसने ते उद्ध्वस्त केले. भाजप तृणमूलसोबत मिळून हिंसाचाराला खतपाणी घालत आहे," असा आरोप त्यांनी केला.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत काँग्रेस जवळपास दोन दशकांनंतर स्वतंत्रपणे रिंगणात उतरली असून, यापूर्वी पक्षाने विविध वेळी टीएमसी आणि डाव्या आघाडीसोबत युती केली होती. गांधी यांनी भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) यांच्यावर "द्वेषपूर्ण विचारसरणी" पसरवत संविधान धोक्यात आणल्याचा आरोप केला. तसेच "मतचोरी" आणि लोकशाही कमकुवत करण्याचेही आरोप त्यांनी यावेळी केले. टीएमसीवर हल्ला चढवत त्यांनी म्हटले की, केंद्र सरकार राज्यासाठी निधी रोखून धरत असतानाही, टीएमसी अप्रत्यक्षपणे भाजपला मदत करत आहे. "सत्ताधारी पक्षाने रोजगार निर्मिती आणि हिंसाचार रोखण्याचे काम केले असते, तर बंगालमध्ये भाजपला स्थानच मिळाले नसते," असे ते म्हणाले.

राज्यातील बेरोजगारीच्या मुद्द्यावर बोलताना गांधी यांनी टीएमसीवर निवडणूक आश्वासन पूर्ण करण्यात अपयश आल्याचा आरोप केला. "पाच लाख नोकऱ्यांचे आश्वासन दिले होते, पण प्रत्यक्षात ८४ लाख तरुण भत्त्यासाठी अर्ज करत आहेत," असा दावा त्यांनी केला. भारत-अमेरिका व्यापार करारावरूनही त्यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला. "या करारामुळे देशातील लघु व मध्यम उद्योगांना फटका बसेल," असे ते म्हणाले.

## 'संसदेची थट्टा' केल्याचा डेरेक ओ'ब्रायन यांचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राज्यसभेतील तृणमूल काँग्रेसचे नेते डेरेक ओ'ब्रायन यांनी केंद्र सरकारवर गंभीर आरोप करत, महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेसंबंधी प्रस्तावित विधेयकांचे मसुदे अद्याप खासदारांना न दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सरकारवर "संसदेची थट्टा" करत असल्याचा आरोप केला.

सोमवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करताना ओ'ब्रायन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर थेट निशाणा साधला. "नरेंद्र आणि अमित संसदेची खिल्ली उडवतच राहिले आहेत. आणि तीही कशी!" अशा शब्दांत त्यांनी टीका केली. पुढे बोलताना त्यांनी नमूद केले की, अवघ्या ४८ तासांत अधिवेशन सुरू होणार असताना प्रस्तावित घटनादुरुस्तीची प्रतदेखील खासदारांना पाहायला मिळालेली नाही. "हुकूमशाही अशी दिसते," असेही ते म्हणाले.

महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना या विषयांवरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे. केंद्र सरकारने २०२९ च्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नारी शक्ती वंदन अधिनियम प्रभावीपणे लागू करण्यासाठी संबंधित विधेयकांना मंजुरी दिली आहे. प्रस्तावित बदलांनुसार लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढवण्याचा विचार असून, त्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद असू शकते.

या विधेयकांमध्ये घटनादुरुस्तीबरोबरच परिसीमन कायद्यातील बदलांचाही समावेश अपेक्षित आहे, ज्यामुळे वाढलेल्या सदस्यसंख्येनुसार नवीन मतदारसंघ रचना करता येईल. याशिवाय दिल्ली, जम्मू-काश्मीर आणि पुदुचेरीसारख्या विधानसभा असलेल्या केंद्रशासित प्रदेशांमध्येही महिला आरक्षणाचा विस्तार करण्याचा विचार आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेवरून विरोधी पक्षांनी सरकारवर पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप केला असून, मोठे घटनात्मक बदल घाईघाईने रेटले जात असल्याची टीका केली आहे. आगामी अधिवेशनात या मुद्द्यांवर जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

## एका वर्षात २.८३ कोटी वाहनांची विक्री

**नवी दिल्ली** : एसआयएएमने सांगितले की, भारतातील ऑटोमोबाईल घाऊक विक्रीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये २,८२,६५,५१९ युनिट्सचा विक्रमी आकडा गाठला असून, तो मागील वर्षाच्या तुलनेत १०.४ टक्क्यांनी वाढला आहे. प्रवासी आणि व्यावसायिक वाहने, दुचाकी आणि तीनचाकी वाहने या सर्व विभागांमध्ये एका आर्थिक वर्षात आतापर्यंतची सर्वाधिक विक्री नोंदवली गेली असून, जीएसटी २.० हा वाढीचा प्रमुख चालक ठरला आहे.

## सीमापार मतदारांचा प्रभाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुपती** : २३ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश सीमावर्ती भागांमध्ये राजकीय उत्सुकता लक्षणीयरीत्या वाढली आहे. सीमापार कौटुंबिक, व्यावसायिक आणि कृषी संबंधांमुळे या भागातील मतदारांचा निवडणूक निकालावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

तामिळनाडूच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये अंदाजे १० ते २० टक्के मतदार तेलगू भाषिक किंवा त्या समुदायाशी निगडित आहेत. त्यामुळे डीएमके, एआयएडीएमके, सीपीएम, सीपीआय, भाजप आणि टीव्हीकेसह प्रमुख पक्षांच्या उमेदवारांसाठी हा मतदारगट निर्णायक ठरणार असल्याचे मानले जात आहे. चित्तूर, तिरुपती, कृष्णगिरी आणि वेल्लोर या सीमावर्ती भागांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून, विशेषतः कृष्णगिरी जिल्ह्यात तेलगू मतदारांची संख्या लक्षणीय आहे. सीमावर्ती भागांतील व्यावसायिक समुदाय, वाहतूक संघटना आणि शैक्षणिक संस्थांवर आंध्र प्रदेशातील नेत्यांचा प्रभाव असल्याचेही निरीक्षण आहे. सीमापार मतदारांची उपस्थिती, आर्थिक परस्परावलंबन, बहुपक्षीय चुरस आणि सीमावर्ती मतदारसंघांचे सामरिक महत्त्व या घटकांमुळे या निवडणुकीत सीमावर्ती प्रभाव निर्णायक ठरू शकतो. अंदाजे ४० ते ५० विधानसभा मतदारसंघांवर या घटकाचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

## महिलांसाठी मासिक मदत, पायाभूत सुविधांवर भर

# तामिळनाडू विधानसभा: भाजपचा जाहीरनामा जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : तामिळनाडू विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने (भाजप) आपला जाहीरनामा जाहीर करत विविध लोककल्याणकारी आणि पायाभूत सुविधा विकासाच्या योजना मांडल्या आहेत. महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, सर्व महिला कुटुंबप्रमुखांना दरमहा २,००० रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे. तसेच प्रत्येक कुटुंबाला १०,००० रुपयांची एकरकमी मदत देण्याची घोषणाही करण्यात आली आहे.




सणांच्या काळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी पोंगल, तमिळ पुथंडू आणि दीपावली या प्रमुख सणांच्या निमित्ताने प्रत्येकी तीन एलपीजी गॅस सिलिंडर मोफत देण्याचे आश्वासन जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक बाबींनाही प्राधान्य देत भगवान मुरुगन यांच्या सन्मानार्थ थायपूसमला राज्योत्सवाचा दर्जा देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच तिरुपरनकुंद्रम टेकडीवरील कार्तिक दीपम प्रज्वलनाची परंपरा पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भाजपने महत्त्वाकांक्षी योजना मांडल्या आहेत. चेन्नई-बंगळूर आणि चेन्नई-हैदराबाद या मार्गांवर हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर उभारणे, कोईम्बतूर-तिरुप्पूर-सेलम आरआरटीएस, विल्लुपुरम-चेन्नई सेमी-अर्बन रेल्वे, तसेच चेन्नईला दिल्ली, मुंबई आणि कोलकात्याशी जोडणाऱ्या नवीन स्लीपर वंदे भारत गाड्या सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी शून्य-एफआयआरची प्रभावी अंमलबजावणी, पीडित व साक्षीदार संरक्षण, गंभीर गुन्ह्यांसाठी जलदगती न्यायालये आणि सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच महिला बचत गट, सहकारी संस्था आणि एमएसएमई क्षेत्राला चालना देण्यासाठी ५० लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज आणि २० टक्के सरकारी खरेदी कोटा देण्याची घोषणाही करण्यात आली आहे.

दरम्यान, सत्ताधारी द्रमुकवर टीका करत भाजपने कायदा-सुव्यवस्था आणि महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. मित्रपक्ष एआयएडीएमकेनेही याच धर्तीवर महिला कुटुंबप्रमुखांना मासिक आर्थिक मदत, मोफत बस प्रवास आणि गॅस सिलिंडर देण्याचे आश्वासन आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे. आगामी निवडणुकीत एनडीए आघाडी सत्तेत येईल, असा विश्वास भाजपकडून व्यक्त करण्यात आला आहे.